क्रमांक : ७८

<u>महाराष्ट्र विधानसभा</u>

<u>पत्रक भाग दोन</u>

<u>मंगळवार, दिनांक १ जुलै, २०२५/आषाढ १०, १९४७ (शके)</u>

७८. महाराष्ट्र विधानसभा नियम १०६ (३) अन्वये शुक्रवार, दिनांक ४ जुलै, २०२५ रोजी सभागृहात चर्चेसाठी घेण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांच्या सूचना :-

(१) **<u>डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांचा ठराव क्र. १०३</u>**

"राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गमवावे लागणे, राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत असणे, हे अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नसणे, या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करण्याची आवश्यकता, तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ, नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता, राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रामा सेंटर (**Trama Center**) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल, तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर (**Trama Center**) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२) **<u>श्री. धनंजय मुंडे, वि.स.स. यांचा ठराव क्र. ३३</u>**

"राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यात यावी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व पुरातन किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) **<u>श्री. राजकुमार बडोले, वि.स.स. यांचा ठराव क्र. ४३</u>**

"दारिद्रय रेषेखालील कुटूंबांची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबांचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या कुटूंबांना पिवळया रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल जनतेला दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

.. २/-

(४) **<u>श्री मनोज जामसुतकर, वि.स.स. यांचा ठराव क्र. १२०</u>**

"राज्यात ज्येष्ठ नागरिकांच्या हितासाठी विविध निर्णय व धोरण ठरविले असताना ज्येष्ठ नागरिकांचे जगणे अत्यंत जिकरीचे होत असल्याचे निदर्शनास येणे, ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या, सुरक्षितता यासाठी ज्येष्ठ नागरिकांचे हितासाठी धोरण ठरवून जनजागृती व वृध्दांसाठी हेल्पलाईन (मदत केंद्र) व संकेतस्थळ सुरु करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५) **<u>श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा ठराव क्र. ६५</u>**

"राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विदयुत पंपांचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विदयुत कनेक्शन मिळण्याकरिता होणारा विलंब त्यामुळे विदयुत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या फळबाग विकास योजनांचे पाण्या अभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १ जुलै, २०२५**

**जितेंद्र भोळे**
**सचिव- १,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**<u>याची प्रत:</u>**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
३. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
४. संगणक कक्ष (website)